झिलमिल ि

ते रा-चौदा वयोगटात मोडणारी ती दोन्ही मुले संगीताची प्रचंड क्रेझी होती. पहिला तर शंकर-जयकिशनच्या गाण्यांनी खुळावलेला. त्यातही लताची 'रसिक बलमा' (चोरी चोरी) आणि 'आँसू की आग लेके' (यहुदी) ही दोन गाणी म्हणजे त्याचा जीव की प्राण ? बरं हे वेड नुसत्या गाण्यांपुरतंच मर्यादित नव्हतं. वैजयंतीमालाच्या बहारदार नृत्यांनी सजलेल्या 'पटरानी'चं पार्श्वसंगीत शंकर-जयकिशनंनी किती मेहनतीने दिलं असेल याचा विचार करीत असतानाच तो पडेल ठरला म्हणून हा रडायचा तेवढा बाकी राहिला.

दुसऱ्याचा बापच प्रसिद्ध ट्रम्पेटवादक पंडित राम प्रसाद शर्मा. त्यांची नेमकी ओळख करून द्यायची तर आर. के.च्या 'बरसात'मधल्या 'पतली कमर हैं...' या गाण्यात त्यानेच ट्रम्पेट वाजविलेला. म्हणजे पुन्हा इथंही शंकर-जयकिशन, पण बापाने आपल्या या थोरल्या चिरंजीवाला व्हायोलीनवर मेहनत घ्यायला लावली. पहिल्यानेही मेण्डोलीन वादनात आपलं कसब दाखविलं होतंच. एकूणच लक्ष्मीकांत कुडाळकर आणि प्यारेलाल शर्मा तत्कालीन रथी-महारथी संगीतकारांच्या ताफ्यात वादक म्हणून तयार झाले आणि स्वतंत्र संगीतकार जोडी म्हणून त्यांचा 'पारसमणी' हा पहिला चित्रपट शुक्रवार, दि. २० डिसेंबर १९६३ रोजी कॅपिटॉल थिएटरच्या पडद्यावर झळकला. लक्ष्मी-प्यारेंनी 'पारसमणी' ते 'बरसात की रात' (१९९८) पर्यंत सुमारे पाचशे चित्रपट स्वरबद्ध केल्याचं लक्षात येतं आणि त्यातल्या पाऊणशे टक्के चित्रपटातली गीते त्यांनी आपले लाडके गीतकार आनंद बक्षींकडून लिहून घेतली. हा गीतकार तसा आधीपासूनच इंडस्ट्रीमध्ये आपलं स्थान पक्कं करायला धडपडत होता. अगदी नेमकं सांगायचं तर १९५८ सालच्या 'भला आदमी'मध्ये संगीतकार निसार बज्मीकडे त्याने 'धरती के लाल, न कर इतना मलाल, तू नहीं है कंगाल...' (गायक - भूषण) हे गाणं लिहून आनंद बक्षीने आपल्या गीतलेखनाचा श्रीगणेशा केला होता. परंतु लक्ष्मीकांत-प्यारेलाल स्वतंत्र संगीतकार बनल्यावर त्याने या जोडीसाठी सर्वप्रथम गाणी लिहिली ती 'मिस्टर एक्स इन बॉम्बे' (१९६४) या चित्रपटासाठी आणि त्यातलं 'मेरे मेहबूब कयामत होगी...' हे किशोरकुमारने गायलेले सुरेख सोलो हेच पहिलं गाणं त्याने लक्ष्मी-प्यारेला लिहून दिलं. आनंद बक्षीच्या गीतलेखनाबद्दल इथं एवढं सविस्तर सांगण्याचा हेतू इतकाच की, आपल्या उमेदीच्या काळात अर्थपूर्ण आणि झटपट गीतरचना करणारा हा ज्येष्ठ गीतकार पुढे काळाच्या ओघात पैशाला पासरीभर गाणी लिहिता लिहिता त्यातला दर्जाच हरवून बसला. अर्थात हीच गोष्ट संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबाबतही घडली. आपल्या सुरुवातीच्या काळात मन लावून सुंदर आणि नावीन्यपूर्ण चाली बांधणारी ही जोडी स्वत:ची गाणी लोकप्रिय करण्यात कमालीची यशस्वी झाली खरी; परंतु पाच-सात वर्षांतच त्यांच्या संगीताचा साचा ठरून गेला. वर्षाकाठी दहा-बारा चित्रपटांना संगीत देण्याच्या नादात त्यातली मोजकीच गाणी चांगली ठरू लागली. त्यांच्या संगीतातील हा बदल १९७० नंतर लगेच दिसून आला. म्हणूनच लक्ष्मी-प्यारे आणि आनंद बक्षी यांच्या कामगिरीचे दोन टप्पे (१९६४ ते १९७० आणि १९७० नंतर पुढचे संगीत) केल्यास त्यांचा आढावा घेणे अधिक सयुक्तिक ठरते.

'मिस्टर एक्स इन बॉम्बे'चा नायकच किशोरकुमार असल्यामुळे लक्ष्मी-प्यारेंनी त्याच्यासोबत फक्त लताचा आवाज वापरला आणि या दोघांचं 'खूबसूरत हसीना जाने जा जानेमन' हे सदाबहार द्वंद्वगीत आणि ढोलकीच्या तालाने सजलेलं 'जुल्मी हमारे सावरिया हो राम' (लता) हे सोलो आजही ऐकायला गोडच वाटतं.

त्यानंतर या जोडीचे 'बॉक्सर', 'लुटेरा', 'श्रीमान फंटुश', 'आसरा' असे चित्रपट येऊ लागले. लक्ष्मी-प्यारेंचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांच्या संगीतात लताच्या आवाजाला अनन्यसाधारण महत्त्व आढळतं. उपरोक्त चित्रपट हे खरं तर हाणामारीने भरलेले सी ग्रेड देमारपटच. पण त्यातली यांची गाणी खऱ्या अर्थाने ए ग्रेडमध्ये मोडणारी. किंबहुना दारासिंगचा 'लुटेरा' हा तर एकट्या लताच्या गाण्यांनी सजलेला एकदम श्रवणीय चित्रपट म्हणावा लागेल. आनंद बक्षीनेही प्रणयाचा पहिल्यांदा आविष्कार झालेल्या नायिकेसाठी - 'नींद निगाहों की खो जाती है, क्योंकि जवानी में हो जाती है मुहब्बत' अशी रचना केली होती. शिवाय 'किसी को पता ना चले बात का, कि है आज वादा मुलाकात का' अशा साध्या शब्दरचनेने सजलेलं त्यातलं क्लायमॅक्स गीत आणि जोडीला 'ओ दिलवालो साजे दिल पे' हे फडकतं जोशपूर्ण गाणं.


आनंद बक्षी



लक्ष्मी-प्यारेच्या आधीच्या चित्रपटांतील सगळीच गाणी दर्जेदार, श्रवणीय आणि त्यांच्या स्वतंत्र शैलीची ओळख सांगणारी होती. त्यातल्या निवडक गीतांचा आवर्जून उल्लेख करायचा तर - 'सुलताना सुलताना, तू न घबराना' (श्रीमान फंटुश), 'नींद कभी रहती थी आँखो में' (आसरा), 'सुनो सजना पपीहे रे' (आये दिन बहार के), 'माँ मुझे अपने आँचल में छुपा ले' (छोटा भाई), 'सावन का महिना' (मीलन), 'मिजाजे गरामी, दुवा है आपकी' (जाल), 'नजर न लग जाये' (नाइट इन लंडन), 'तू कितनी अच्छी है' (राजा और रंक), 'माझी चल ओ माझी चल' (आया सावन झुमके), 'खिजा के फूल पे' (दो रास्ते), 'एक बंजारा गाये' (जीने की राह), 'सांझ सवेरे अधरो पे मेरे' (माधवी), 'झिलमिल सितारों का' (जीवन मृत्यू), 'श्याम ढले जमुना किनारे' (पुष्पांजली) वगैरे वगैरे.

उपरोक्त निवडक गाण्यांवर नुसती नजर फिरवली तरी लक्ष्मी-प्यारे यांनी दिलेल्या वैविध्यपूर्ण चाली आणि गीतकार आनंद बक्षीची तशीच साधीसोपी परंतु अर्थपूर्ण गीतरचना याची कुणालाही कल्पना यावी. परंतु १९७० साल संपता संपता या संगीतकार जोडीचा गाण्यांचा दर्जा आणि आनंद बक्षीची शब्दरचना या दोन्ही गोष्टी झपाट्याने उतरणीला लागल्याचं लक्षात येतं. उत्तम संगीत आणि तशीच गाणी देण्याची क्षमता या जोडीत असूनही अफाट लोकप्रियता आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी करावी लागणारी तडजोड यामुळे त्यांची गाणी एकाच साच्यातून वेगाने बाहेर पडू लागली.

थोडक्यात सांगायचे तर या जोडीचे सुरुवातीच्या काळातील

सितारों का...

ने
'नजर
है'
सावन
गाये'
जमुना
गीतकार
चना
संपता
आनंद
ला
गाणी
ता
डजोड
डू
ातील

स्वस्त आणि मस्त संगीत १९७० नंतर लयास गेले आणि ढीगभर गाण्यांतून मोजकीच वेधक गाणी निर्माण होऊ लागली. त्यांची नेमकी अवस्था 'दुश्मन'मध्ये त्यांनीच दिलेल्या 'पैसा फेको तमाशा देखो'सारखी झाली. मंति- दिग्दर्शक शक्ती सामंताच्या 'आराधना'पासून सुपरस्टार झालेल्या राजेश खन्नाचा १९७१ नंतर पुढील चार-पाच वर्षांत झालेला अस्त आणि त्याच दरम्यान अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चनच्या 'जंजीर'द्वारे धडाकेबाज चित्रपटाबरोबरच त्यातील संगीताचा झालेला कोंडमारा या सगळ्याचा एकत्रित परिणाम त्या कालखंडातील एकूणच सर्व चित्रपटांबाबत दिसून आला. त्याला लक्ष्मी-प्यारे आणि आनंद बक्षी अपवाद ठरणं शक्यच नव्हतं. राजेश खन्नाचा 'दो रास्ते' या जोडीचा चांगलाच संगीतमय केलेला. त्यानंतर आलेल्या 'हाथी मेरे साथी, मेहबूब की मेहंदी, रोटी, अनुरोध' वगैरे चित्रपटांतील गाणी त्या काळात चांगलीच लोकप्रिय ठरली होती. विशेषत: 'चल चल मेरे साथी' (हाथी मेरे साथी) हे किशोरकुमारचं सोलो समस्त बालप्रेक्षक मोठ्या आवडीने गाताना दिसायचे. तसंच 'इस जमाने में' (मेहबूब की मेहंदी), 'गोरे रंग पे न इतना गुमान कर' (रोटी), 'चल दरिया में डूब जायें'(प्रेम कहानी) यासारख्या गाण्यांनाही उदंड लोकप्रियता मिळाली होती.

या कालखंडातील आणखी एक विशेष म्हणजे गीतकार आनंद बक्षीने स्वत:च 'मोम की गुडिया'मध्ये गायिलेली गाणी. 'मै ढूँढ रहा था सपनों में' या वेगळ्या चालीतील सोलोबरोबरच त्याने लतासमवेत गायलेलं 'बागो में बहार आयी' हे गाणंही तेव्हा बराच काळ रेडिओवर ऐकू यायचं. लक्ष्मी-प्यारेंच्या संगीताचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते. त्यांनी रागदारी, कोरस गीते आणि उडत्या चालीची ठेकेदार गाणी देतानाच काही शांत मूडची गीतेही देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता; परंतु मुळातच त्यांच्या संगीतात फारसा सखोलपणा नसल्यामुळे अशा गाण्यांचा आस्वाद घेताना ती वरवरची भासतात. वानगीदाखल 'सूनी रे नगरिया, सूनी रे सेजरिया' (उपहार), यह जीवन है, इस जीवन का' (पिया का घर) या गाण्यांचा उल्लेख करता येईल; परंतु अशा परिस्थितीतही या जोडीची लोकप्रियता एवढी होती की खुद्द राज कपूरने त्यांना आपल्या आर. के. बॅनरसाठी पाचारण केले. 'मेरा नाम जोकर'चं दारुण अपयश, जयकिशनचा अकाली मृत्यू यामुळे सैरभैर झालेल्या राज कपूरला 'बॉबी'द्वारे नव्याने जीवदान मिळालं आणि त्यातली 'मै शायर तो नहीं', 'मुझे कुछ कहना है' यासारख्या गीतांबरोबरच लक्ष्मी-प्यारेंनी आपल्या टिपिकल ढंगात दिलेलं लताचं 'अंखियों को रहने दे' हे खुमासदार सोलो. यासारखी गाणी तत्कालीन तरुण पिढीला खुळावून गेली.


लक्ष्मीकांत-प्यारेलाल

आर. के. च्या 'सत्यम शिवम सुंदरम्'मध्येही गीतकार आनंद बक्षीने एका गाण्यापुरती का होईना हजेरी लावली होती आणि नेमकं तेच गाणं लक्ष्मी-प्यारेंनी एकदम विचित्र ठेका वापरून बांधलं होतं. लतानेच गायलेल्या या सुंदर गीताचा मुखडाही आनंद बक्षीने छानच लिहिला होता- 'भोर भए पनघट पे, मोहे नटखट शाम सताए...'

याच काळातील 'कच्चे धागे, लोफर, मनचली, अमर अकबर ॲन्थनी, अपनापन, धरमवीर, मै तुलसी तेरे आँगन की, आशा' यांसारख्या असंख्य चित्रपटांना संगीत देताना, त्यातील गाणी लिहिताना या जोडगोळीने 'चल बैठ जा, बैठ गयी'सारख्या सवंग रचना केल्या आणि त्याबद्दल टीकाही सहन केली; परंतु त्याच दरम्यान आलेला ऋषी कपूर-जयाप्रदाचा 'सरगम' हा नृत्यसंगीतमय चित्रपट त्यातील अजरामर गाण्यांनी अक्षरश: अविस्मरणीय केला ही गोष्ट नाकारून चालणार नाही. रफी-लताच्या आवाजाचा या जोडीने सुरुवातीपासूनच विपुल प्रमाणात वापर केला असला तरी 'सरगम'मधली 'डफलीवाले' काय किंवा 'परबत के उस पार' ही द्वंद्वगीते, त्यांची चाल, वाद्यमेळ आणि रफी/ लताने त्या चालीचं केलेलं सोनं या सगळ्याच गोष्टी इथं उत्तमरीत्या जमून आल्या. फक्त त्याच सुमारास घडलेली ती दु:खद घटना- रफीचं निधन आणि तेही 'तू कही आसपास है दोस्त' हे आनंद बक्षीचेच शब्द अखेरचे गाऊन- सर्व रसिकांच्या मनाला चटका लावून गेली.

लक्ष्मी-प्यारे आणि आनंद बक्षी यांची 'सरगम'नंतर पुन्हा एकदा श्रवणीय गाणी ऐकू आली ती 'एक दूजे के लिए'मध्ये. अर्थात हा काळ खूपच अलीकडचा असल्यामुळे त्याबद्दल अधिक विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नसावी; परंतु तरीही 'नसीब, अर्पण, हीरो, नगीना, राम अवतार, राम लखन, सौदागर, खुदा गवाह, खलनायक, प्रेम ग्रंथ' आणि अगदी अलीकडे येऊन गेलेला 'ओ मम्मी मम्मी...' असं गाणाऱ्या गोविंदाचा 'दिवाना मस्ताना'पर्यंत लक्ष्मी-प्यारे आणि आनंद बक्षी यांनी गाणी दिली. यातील बहुसंख्य चित्रपट वेगवेगळ्या चॅनेल्सवरून पुन्हा पुन्हा पाहावयास मिळत असल्यामुळे त्यातील गाण्यांचा उल्लेख टाळला आहे; परंतु या संगीतकार- गीतकार जोडीचा एकूण कारकीर्दीचा थोडा साकल्याने विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते. या जोडीने, रफी, लता, मुकेश, आशा, मन्ना डे, किशोरकुमार असे सगळेच गायक कलावंत मोठ्या खुबीने वापरले. विशेषत: त्यांनी एकट्या लताला दिलेली कितीतरी सोलोज अजरामर नि अविस्मरणीय ठरली आहेत. थोडं खोलात जाऊन तुलनात्मक विचार करायचा म्हटलं तर आधीच्या काळातील काही सामान्य संगीतकार आणि ज्या संगीतकारांनी लताच्या आवाजाचा मर्यादित वापर केला अशा पूर्वीच्या संगीतकारांपेक्षा लक्ष्मीकांत प्यारेलाल नक्कीच श्रेष्ठ समजले जावेत. कारण लताची काही निवडक गीते रसिकांना आवर्जून विचार करायला लावतात. शिवाय काही झालं तरी या संगीतकारांची स्वत:ची अशी स्वतंत्र शैली होती.

आज लक्ष्मीकांत कुडाळकर नसल्यामुळे प्यारेलाल शर्मा एकटा पडला आहे. पण तरीही आयुष्यात देण्याजोगं सगळं काही देऊन झाल्यामुळे तो तसा समाधानी आहे. मात्र गेल्या चाळीस वर्षांपासून सातत्याने गाणी लिहिणारा नि आता वृद्धत्वाकडे झुकलेला आनंद बक्षी आजही काल-परवा इथं आलेल्या गीतकार समीरच्या बरोबरीने अखंड गीतरचना करताना दिसतोय. त्या रचना आशयसंपन्न किंवा फारशा अर्थपूर्ण नसतीलही. पण आजच्या काळाला अनुरूप मात्र नक्कीच आहेत.

■ विजय शिंगोर्णीकर